IMPACT FACTOR 5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Journal
ISSN 2455-4375

# जागतिकीकरणाच्या विळख्यात भारतीय लोकशाही

**डॉ. अरविंद सोमनाथ**
(सहाय्यक प्राध्यापक)
रा. सू. बिडकर कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हिंगणघाट जि. वर्धा ४४२३०१
मोबाइल नं - ७५८८१८७३०९
ईमेल - arvindsomnathe21@gmail.com

---

जागतिकीकरणाचा अर्थ म्हणजे संपूर्ण जगाची एका मोठ्या बाजारपेठेत रूपांतरित होण्याची प्रक्रिया होय. वस्तू आणि सेवा तसेच भांडवल आणि श्रम यांच्या व्यापारावरील निर्बंध उठवून जागतिक पातळीवर व्यापार मुक्तपणे घडून येण्याची प्रक्रिया यात सामावलेली आहे. ही संज्ञा अलीकडे लोकप्रिय झाली असली तरी ही प्रक्रिया १९व्या शतकापासून सुरू झाली. भांडवलशाहीची वाढ, उपलब्ध सागरी दळणवळण, टेलिग्रामपासून ते २०व्या शतकातील उपलब्ध हवाई मार्ग, दूरध्वनी, संगणक, बहुराष्ट्रीय कंपन्या, व्यापार आणि गुंतवणुकीवरील निर्बधा यांमधील लवचिकतेतून जागतिकीकरण सुरू झाले. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात माहिती तंत्रज्ञान, इंटरनेट आणि सेवांचा व्यापार जागतिक पातळीवर खुला झाल्याने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला.

जागतिकीकरणाच्या समर्थकांच्या मते, अविकसित आणि विकसनशील देशांच्या आािथक विकासाला गती प्राप्त होऊन विकसित देश आणि बहुराष्ट्रीय कंपन्या गरीब देशात मोठी भांडवल गुंतवणूक करीत आहेत. अद्ययावत तंत्रज्ञानाचा प्रवाह मागास राष्ट्रांकडे जाताना दिसतो आहे. जागतिकीकरणाच्या धोरणातून दक्षिण-पूर्व आशियाई देश आणि ब्राझील यांनी विकास संपादन केल्याचे दिसून येत आहे. जागतिकीकरणांतर्गत उदारीकरण, खासगीकरण, तंत्रज्ञानात्मक क्रांती, बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीयीकरण, राष्ट्र राज्याचा ऱ्हास, कल्याणकारी राज्याचा ऱ्हास, बाजारपेठांचे सार्वभौमत्व, बहुसांस्कृतिकवाद असेही प्रवाह सुरू झाले.

संकल्पनात्मक अर्थाने पाहता भौगोलिकता आणि राष्ट्रीय ओळख नष्ट होऊन इतिहास आणि राजकारण यांचा पुनर्जन्म होताना दिसतो. फ्रान्सिस फुकुयामा यांनी ‘मानवी शासनाचे उदारमतवादी लोकशाहीचे अंतिम प्रारूप’ असे संबोधले. थॉमस फ्रीडमनच्या मते, ‘जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त आणि माहितीच्या एकत्रीकरणातून एकच एक अशी जागतिक बाजारपेठ आणि संस्कृतीची निर्मिती होय.’ अँथनी गिडन्स म्हणतो त्याप्रमाणे ‘जागतिकीकरण म्हणजे जगभरात सामाजिक संबंधांचे सघनीकरण घडून येणे होय’.

‘जे स्थानिक आहे ते जागतिक आहे आणि जे जागतिक ते स्थानिक आहे’ या प्रक्रियेला रॉबर्टसन ‘विशिष्टतेचे सार्वत्रिकीकरण’ आणि ‘सार्वत्रिकतेचे विशिष्टीकरण’ या रूपाने ओळखतो. संपूर्ण जग हे जागतिक खेडे बनून आजघडीला ‘विचार जागतिक आणि कृती राष्ट्रीय’ असाच नारा होताना दिसतो. ग्लोबल आणि लोकल

यातून ‘ग्लोकल’ बनले आहे. या कारणानेच अरेनाज यांनी यास ‘हायब्रीडायझेशन’ म्हटले आहे. सांस्कृतिक आक्रमण आणि मागास राष्ट्रांचे आ!थक सार्वभौमत्व पायदळी तुडवण्यामुळे जागतिकीकरणास नववसाहतवादाचे नवे रूप मानण्यात येते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कोणतीही व्यक्ती स्वतंत्र अथवा विभक्त समूहाचा भाग न राहता संपूर्ण समाजच थेट जागतिक व्यवहाराशी जोडला गेला आहे. या संपूर्ण प्रक्रियेतून सर्वसाधारणपणे तीन आविष्कार समजून घेता येतात.

जागतिकीकरणाचा सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर परिणाम झालेला दिसतो. कुटुंब व्यवस्था, विवाह, स्त्री-पुरुष संबंध, जाती, जनजाती, भाषा इ. सामाजिक घटकांवर मोठा प्रभाव पडत आहे. लहान मुले, तरुण वर्ग आणि वृद्धांचे जीवनमान प्रभावित झालेले आहे. ग्राहकवादाच्या प्रभावातून नवसमाज आकार घेत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे लोकांच्या जीवनाचा सांस्कृतिक आकृतिबंध बदलला असून अमेरिकन कपडे, चायनीज अन्न, फ्रेंच व्हिस्की, इंग्लिश पॉप संगीत या नित्य परिचयाच्या झालेल्या आहेत. जागतिकीकरणातून नव्या नागरी समाजाची निर्मिती होत आहे.

जागतिकीकरणाचा स्पष्ट आविष्कार बाजारपेठा, व्यापार, वस्तू आणि वित्तीय गुंतवणूक या क्षेत्रांतील आ!थक प्रक्रियांमध्ये दिसून येतो. आ!थक धोरणे,कृषी, रोजगार, नस!गक आणि मानवी संसाधने यांवरही जागतिकीकरणाने आपला प्रभाव उमटवलाआहे. जागतिकीकरणाची नस!गक नाळ उदारीकरणाशी जोडली असल्याने भांडवलाचा प्रवाह व बहुराष्ट्रीय कंपन्या व कॉर्पोरेशन्स स्वत:चे जाळे जगभर विणताना दिसत आहेत. त्यातून डिस्निफकेशन, मॅकडोनाल्डायझेशन आणि कोका कोलोनायझेशन इ. शब्द आपल्या अंगवळणी पडत आहेत. थेट परकीय गुंतवणूक हे जगभरातील घटीत बनले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून आणि माहिती तंत्रज्ञानाच्या स्फोटातून राष्ट्र-राज्याच्या सीमा अंधुक होऊन राष्ट्रांचे सार्वभौमत्व धोक्यात आलेले आहे. कल्याणकारी भूमिकेतून माघार घेऊन राज्याने कायदा सुव्यवस्था सांभाळावी, असा दबाव तयार होत आहे. राज्यसंस्था बिगर राजकीय अभिकर्त्यांच्या मदतीने राज्यकारभार चालवीत आहे. त्यातून लोकशाही राजकारणाचा अवकाश नागरी समाजाकडून व्यापला जात आहे.

जागतिकीकरणामुळे ‘राष्ट्रातीत नागरिकत्व’ निर्माण होत आहे. किमलिका यांच्या मते, आजघडीला ‘बहुसांस्कृतिक नागरिकत्व’ उदयाला येत आहे. पुढे ही प्रक्रिया अशीच सुरू राहिली तर गोल्डस्मिथच्या शब्दात ‘जागतिक नागरिकत्व’ या संकल्पना मूर्त रूपात येऊ शकतील. याउलट जागतिकीकरणात सांस्कृतिक वैविध्य नष्ट होऊन एकछापी संस्कृती निर्माण होते असाही प्रतिवाद केला जातो.

सोविएट युनियनचे विघटन आणि आखातातील युद्ध, देशांतर्गत निर्माण झालेली राजकीय अस्थिरता तसेच अनिवासी भारतीयांची गुंतवणुकीमधून माघार यांच्या एकत्रित परिणामातून भारताने मिश्र अर्थव्यवस्थेला सोडचिठ्ठी देऊन खुले आ!थक धोरण स्वीकारले. खासगी क्षेत्रावरील निर्बंध काढून गुंतवणुकीचे मार्ग खुले करण्यात आले तसेच विदेशी गुंतवणुकीवरील बंधने हटवून भारतीय बाजारपेठ जागतिक बाजारपेठांशी जोडली गेली. त्यातून भारतात उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण या प्रक्रिया घडून आल्या.

मुख्य परीक्षेची तयारी करताना जागतिकीकरणाचे वर्तमान संदर्भ तपासावेत. त्यासोबत जागतिकीकरणाचे भारतीय आणि जागतिक अर्थव्यवस्थेवरील परिणाम, तसेच आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटनांची भूमिका लक्षात घ्यावी. भारतातील बदलती सार्वजनिक धोरणप्रक्रिया आणि योजना निर्मितीवरील जागतिकीकरणाचा प्रभाव समजून घ्यावा. जागतिकीकरणामुळे सामाजिक घटकांतील वाढती दरी आणि सामाजिक प्रश्नांबद्दल वाढती अनास्था याचाही विचार करावा. त्याचप्रमाणे जागतिकीकरणामुळे स्त्रियांसमोर उभी ठाकलेली आव्हाने विचारात घ्यावी लागतील.

**सत्ता बदलली, जागतिकीकरण तसेच :**

भाजप असो की जनता दल यांनी सत्तेबाहेर असताना जागतिकीकरणाला विरोध केला, पण सत्तेवर आल्यानंतर मात्र त्यांनी आर्थिक धोरणात फार बदल केले नाहीत.जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत पुढाकार घेतलेले युरोप, अमेरिकेतल्या देशांमध्ये आज विलगीकरणाची प्रक्रिया घडताना दिसते आहे. ब्रेक्झिट हे त्याचे वेगळ्या रुपातले उदाहरण आहे. या देशांनंतर भारताने जागतिकीकरण स्वीकारले, पण या साऱ्या प्रक्रियेत भारताने काय कमावले, काय गमावले हे तपासायचे तर त्यासाठी निश्चित काळाची चौकट आखून घ्यायला हवी. तरच नव्या जगाच्या साच्यामधून भारतातील हे जागतिकीकरण कसे झाले हे पाहणे, सुलभ होईल.

**जागतिकीकरणाचा काल'खंड' :**

तीस वर्षांचा कालावधी जागतिकीकरणाचा आढावा घेण्यासाठी पुरेसा तर आहेच, परंतु अत्यंत योग्यही आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुमारे ४० वर्षांनी आपण जागतिक मुक्त स्पर्धेला दरवाजे खुले केले. या ४० वर्षांतली पहिली दहा-बारा वर्षं पायाभरणीची धरून वगळूया. म्हणजे उदारीकरणाच्या आधीची ३० वर्षं आणि नंतरची आताची ३० वर्षं, १९५९ ते १९९० आणि १९९१ ते २०२० अशी ही साधारण समान कालविभागणी होईल.

आधीच्या ३० वर्षांतील पहिली १७ वर्षं काँग्रेस पक्षाची सलग सत्ता देशात होती. १९७७ ते ८० जनता पक्ष आणि नंतरची नऊ वर्षं १९८९पर्यंत पुन्हा काँग्रेसची सत्ता केंद्रात होती.पुढची दीड वर्षं म्हणजे जून १९९१पर्यंत जनता दल आणि समाजवादीजनता पक्ष यांची सरकारेकेंद्रात होती. जून १९९१ला पुन्हा पुढील पाच वर्षांसाठी काँग्रेस सत्तेत आली, आणि याच दरम्यान खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यांचा स्वीकार करणारी नवी अर्थनीती आपल्या देशानं अवलंबली. हा एक राजकीय कालखंड आपण नमूद केला. पुढची ३० वर्षं पाहिली, तर मे १९९६ पर्यंत काँग्रेसची सत्ता आणि पुढे तिथपासून ते ऑक्टोबर १९९९ पर्यंतच्या कालखंडात भारतीय जनता पक्ष आणि जनता दल या पक्षांची तीन सरकारे आणि तीन पंतप्रधान देशाने पाहिले.ऑक्टोबर १९९९ ते मे २००४ या काळात भारतीय जनता पक्षाच्या सरकारने पाच वर्षांची टर्म पूर्ण केल्यानंतर पुढची सलग १० वर्षं, मे २०१४पर्यंत काँग्रेसचे सरकार केंद्रात होते आणि विशेष म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिकीकरणाचा टप्पा ज्यांनी सुरू केला, ते माजी अर्थमंत्री मनमोहन सिंग हे या सलग दहा वर्षांत देशाचे पंतप्रधान होते. या दहा वर्षांत त्यांनी आर्थिक सुधारणांना पुन्हा एकदा वाव दिला. मे २०१४पासून आजपर्यंत भारतीय जनता पक्षाचे सरकार केंद्रात आहे.

राजकीय क्रम एवढ्याकरता आपण विचारात घेतला आहे, की भारतीय अर्थव्यवस्थेला नवे वळण देणाऱ्या जागतिकीकरणाच्या टप्प्याच्या आगेमागे देशाची एकंदर धोरणं ठरवणाऱ्या सरकारनामक यंत्रणेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. देशातल्या उलथापालथी केवळ राजकीय नसतात, तर त्यांना आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक चारित्र्यही असते.परस्परविरोधी विचारसरण्या असतात आणि त्याचे परिणाम सर्वच बाजूंनी उमटलेले दिसतात. आधीच्या सरकारने राबवलेली धोरणे नंतर आलेलं दुसऱ्या पक्षाचे सरकार आहेत त्या स्वरूपातच पुढे रेटेल असे नाही. बरेचदा तर आधीची धोरणे निकालात काढण्याची रीत दिसते. ते त्या त्या संबंधित सरकारचे वैशिष्ट्य असल्याचे निदर्शन असते. अशा स्थितीत भारताच्या आर्थिक धोरणाबाबत मात्र फार मोठे फेरबदल या विविध सत्तांतरांमुळे झालेले दिसत नाहीत.

**भारताने जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले, तेव्हा काँग्रेस सरकार होते. या पहिल्या टप्प्यात भारतीय जनता पक्षाच्या स्वदेशी मंचसारख्या शाखांनी या धोरणाला, विशेषता उदारीकरणाला आणि परकीय भांडवलाला विरोध केलेला दिसतो. जनता पक्ष व जनता दलाच्या शाखांतूनही हाच सूर उमटलेला दिसतो, हे पक्ष सत्तेवर आल्यानंतर मात्र त्यांनी धोरणात फार मोठे बदल केलेले दिसत नाहीत.**

विशेषकरून भारतीय जनता पक्षाने सुरुवातीला दोन अल्पजीवी टर्म्स,पुढे पाच वर्षांची एक पूर्ण टर्म आणि आता २०१४पासून मिळालेल्या लोकमताच्या कौलानुसार किमान २०२४पर्यंतच्या कालावधीपर्यंतची पूर्ण १० वर्षं सत्ता हाती राखलेली आहे. शिवाय जनता पक्ष, जनता दल यांची जी अल्पजीवी सरकारे येऊन गेली, त्यातही भाजप सहभागी होताच. या संपूर्ण वाटचालीत काँग्रेसेतर पक्षांच्या सरकारांनीही उदार आर्थिक धोरणास हात लावलेला दिसत नाही.

कोणत्याही सरकारने धोरणात मोठे फेरफार केले नाहीत, याचे कारण आपण केलेल्या आंतरराष्ट्रीय सामंजस्य करारांमध्ये आणि जागतिक व्यवहारांच्या रेट्यात आहे. जागतिकीकरण ही प्रक्रिया कोण्या एका देशापुरतीच मर्यादित नव्हती, तर अर्थव्यवस्थेला चालना देऊ पाहणाऱ्या असंख्य विकसित आणि विकसनशील देशांनी एकत्रितपणे सुरू केलेली ती प्रक्रिया होती. तिच्यापासून मुक्त होणेकिंवा त्यात मूलभूत बदल करणे हे या करारांमुळे अशक्यच होते आणि आहेही. काही संरचनात्मक बदल करणे शक्य होते आणि आर्थिक सुधारणा अंमलात आणत मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारनं ते केले असे दिसते.

समाजकल्याणकारी योजना, गरीब घटकांसाठी आर्थिक अनुदाने, सेवापुरवठा यंत्रणांच्या कार्यपद्धती, अन्नसुरक्षा आणि सामाजिक सुरक्षा यांसारखी पावले उचलणे हे करत असताना त्यांच्या अमलबजावणीच्या पद्धतीत बदल आणले. हे बदल वित्तीय क्षेत्रांशी जोडलेले होते. उदाहरणार्थ रेशनच्या अनुदानित मूल्याची रक्कम लाभार्थींच्या बँक खात्यात थेट जमा करणेकिंवा सामाजिक सुरक्षेतील निवृत्तीवेतन रक्कम (ती तुटपुंजी आहे हे मान्य करून) सार्वजनिक उपक्रमांतील एलआयसीसारख्या विमा कंपन्यांमार्फत फिरवणे. वास्तविक काँग्रेस सरकारांच्या काळातच बँका, विमा क्षेत्र, वित्तीय कंपन्या यांच्यात परदेशी गुंतवणूक आणि परकीय कंपन्यांना भारताची बाजारपेठ खुली करून दिली गेली. मात्र कल्याणकारी योजना त्यांनी या खासगी क्षेत्राला मोठ्या प्रमाणात जोडलेल्या दिसत नाहीत. खासगी कंपन्यांच्या वित्तव्यवहारांसाठी नवउच्चमध्यमवर्गाची

बाजारपेठ उपलब्ध होतीच. अगदी २००८च्या जागतिक मंदीतही ही बाजारपेठ तगून राहिली होती. भारताच्या आर्थिक धोरणांमध्ये फार मोठे बदल झाले नाहीत हे जरी खरे असले, तरी सतत बदलत राहणाऱ्या राजकीय चित्रांमुळे त्यात काही कमकुवतपणा किंवा त्रुटी निर्माण झाल्या का हे तपासून पाहण्याची गरज आहे. हा मुद्दा आपण या लेखमालेच्या पुढील काही भागांत विचारासाठी पुढेमागे घेणारच आहोत.तूर्तास जागतिकीकरण आणि त्याचे भारतीय समूहांवर झालेले परिणाम आपल्याला समजून घ्यावे लागतील.

भारताने जागतिकीकरण स्वीकारले, त्यावेळची आपल्या देशाची आर्थिक स्थिती काय होती हे प्रथम समजून घ्यायला हवे. १९९१ साली तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव आणि अर्थमंत्री डॉ.मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली नवे खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण (खाउजा) आर्थिक धोरण स्वीकारण्यात आले, तेव्हाची भारताची आर्थिक स्थिती असाधारण म्हणावी अशी होती. परकीय कर्जाचा असह्य बोजा आणि थकित देणी यांनी अर्थव्यवस्था बेजार झालेली होती. १९८०-८१ साली जीडीपीच्या ३६ टक्के असलेले ४८.५ दशकोटींचे अंतर्गत कर्ज वाढून २८३ दशकोटींवर गेले होतं.हे प्रमाण जीडीपीच्या ५४ टक्के इतकेहोते. वित्तीय तूट आणि चालू खात्यातील म्हणजे करंट अकाउंटमधील तूट प्रचंड प्रमाणात वाढली होती.सरकारी उपभोक्ता खर्च मोट्या प्रमाणात होता आणि हा सर्व खर्च अनुत्पादक होता. चलनवाढ १७ टक्क्यांवर पोहोचला होता आणि परकीय चलनाचा साठा वेगाने खाली येत होता. तो इतका खाली आला होता की आपण जेमतेम एक आठवड्यापुरतीचआयातीची परकीय देणी फेडू शकण्याची शक्यता निर्माण झाली होती.आपल्यावरील कर्जाच्या परतफेडीचे पुनर्नियोजन करणे आणि विकासाची गती वाढविण्यासाठीफेररचना करणे हे निर्णय सरकारला घेणे भागच होते.

१९७७ ते १९९० या काळात देश राजकीय अस्थिरतेतूनही गेला होता. १९९१ पर्यंत देशाच्या दोन पंतप्रधानांच्या हत्या झाल्या होत्या. विशेषकरून १९८९ ते १९९१ हा अत्यंत अस्थिर कालखंड होता. सततच्या सत्ताबदलांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम काही प्रमाणात तरी होणे अपरिहार्य होते. जागतिक व्यापारव्यवहारही बदलत होतेच. आयातीची देणी फेडणे, निर्यात वाढवणे, रोजगारनिर्मिती, परकीय चलनसाठा वाढवणे अशी अनेक आव्हानं देशासमोर होती. या पार्श्वभूमीवर देशाने खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यांचा समावेश असलेले नवे उदार आर्थिक धोरण स्वीकारले. नवं धोरण स्वीकारल्यानंतरच्या चार वर्षांनंतर पुन्हा देशात पुढील तीन वर्षं राजकीय अस्थिरतेची तर होतीच, परंतु सामाजिक अशांततेचं एक दीर्घकालीन पर्व या काळात सुरू झाले, ज्याचा प्रभाव आणि दुष्परिणाम आपण सारे आज या घडीलाही अनुभवत आहोत. धार्मिक उन्माद अणि मग त्यातून पुढे सुरू झालेला दहशतवादी घटनांचा सिलसिला भारताच्या अर्थव्यवस्थेपुढचे मोठे आव्हान ठरला. आज तीस वर्षांनंतर भारताच्या वाटचालीचा आढावा घेताना जागतिकीकरणाचा आणखी एक अवचित पैलू जागतिक पातळीवर पुढे येत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत पुढाकार असलेले युरोप, अमेरिकेतले देश आज पुन्हाविलग होण्याच्या प्रक्रियेत आहेत. ब्रेक्झिट हे त्याचे वेगळ्या रुपातले उदाहरण आहे. युरोपीय समुदायात पसरलेली अस्वस्थता हेही त्याचेच निदर्शन आहे.

उत्पादन, वितरण, विनिमय, आयात/निर्यात यांचे एक नवे प्रारूप उदयाला येताना दिसत आहे.

अमेरिकेच्या अध्यक्षांनी भारताच्या सदिच्छा भेटीवर आले असताना एकतर्फी अब्जावधीच्या शास्त्रास्त्रविक्री व्यवहाराची जाहीर बोहनी करणे आणि बदल्यात भारताकडूनच्या निर्यातीविषयी संदिग्धता कायम असणे हे त्याचंच उदाहरण आहे.जागतिकीकरणाचा आढावा या टप्प्यावर म्हणूनच अपेक्षित आहे.

**संदर्भ :**


- जगतिकीकरण आणि भारत , डॉ कल्याण गडकर ,चिन्मय प्रकाशन.
- भारतीय राज्यव्यवस्था, डॉ.भा.ल.भोळे, २०११, पिंपाळपुरे प्रकाशन,नागपुर.
- आंतर्राष्ट्रीय राजकारण, प्रा. बि. तोडकर, प्रशांत तोडकर.